**ठळक बातम्या**

- भारताचं एलपीजी वाहक जहाज ‘ग्रीन सान्वी', होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेने रवाना

- बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं, असं मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- नाशिक जिल्ह्यात दिंडोरी इथं गाडी विहीरीत कोसळून ९ जणांचा मृत्यू/ मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर

**आणि**

- नांदेड इथं दोन गटात झालेल्या हिंसाचारात तीन जणांचा मृत्यू

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जहाज ‘ग्रीन सान्वी', ४४ हजार टन एलपीजी घेऊन होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेने रवाना झालं आहे. इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अनेक निर्बंध लादले असले तरी भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना सुरक्षितपणे जाण्याची परवानगी दिली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या महिन्याभरात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारं हे सातवं भारतीय जहाज आहे. सामुद्रधुनीच्या पश्चिमेला अडकलेल्या १७ भारतीय जहाजांपैकी, 'ग्रीन आशा' आणि 'जग विक्रम' ही दोन जहाजं देखील एलपीजीनं भरलेली आहेत. या जहाजांना सामुद्रधुनी पार करण्याची लवकरच परवानगी मिळेल आणि एलपीजीच्या तुटवड्याचा सामना करणाऱ्या भारतीयांना मोठा दिलासा मिळेल, असं वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या गरीब आणि मध्यमवर्गीय प्रवाशांना रेल्वे प्रवासाचा सुखद आणि सुरक्षित अनुभव देणं, याला रेल्वे विभागाचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक नवी दिल्लीत झाली, त्यावेळी ते बोलत होते. प्रवाशांच्या गरजांनुसार सोयीसुविधांचा विस्तार आणि रेल्वेच्या आधुनिकीकरणावर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

**<><><><><>**

उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे होऊ घातलेली बारामती मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. आगामी पोटनिवडणुकीत बारामती मतदारसंघात रिक्त झालेल्या जागेवरून सुनेत्रा पवार निवडणूक लढवणार आहेत. सर्व पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देऊन महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेचं पालन करावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री पोटनिवडणूक**

माजी गृहमंत्री दिवंगत आर आर पाटील यांच्या निधनानंतर त्यांच्या मतदारसंघातून पाटील यांच्या पत्नी सुमन पाटील या बिनविरोध निवडून आल्या होत्या याची आठवणही यावेळी मुख्यमंत्र्यांनी करून दिली. येत्या २३ एप्रिलला ही निवडणूक होणार आहे.

**<><><><><>**

एनएचएआय म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं महाराष्ट्रातल्या वाढवण बंदरापासून राष्ट्रीय महामार्ग ४८ वर ‘तवा’ या गावापर्यंत चार-पदरी द्रुतगती महामार्गाच्या बांधकामासाठीचं कंत्राट मंजुरी पत्र जारी केलं आहे. या कामासाठी २ हजार ३६० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग

आणि एनएच-४८ यांना जोडणारा हा द्रुतगती महामार्ग, वाढवण बंदराचा अंतर्गत भागाशी संपर्क वाढवेल .

**<><><><><>**

नांदेड, जिल्ह्यातल्या लोहा पंचायत समितीचे माजी उपसभापती आणि आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे कट्टर समर्थक नरेंद्र गायकवाड यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजिनमा दिला. त्यानंतर गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात पोलिसांनी एका बेवारशी  टेम्पोमधून ६ लाख ६० हजार रुपये किंमतीचा बंदी घातलेला गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले आहेत.  मीरा भाईंदर, वसई आणि विरार पोलिसांच्या पथकाला नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रस्त्याच्या कडेला हा टेम्पो आढळला, अशी माहिती पोलिसांनी आज दिली. टेंपोच्या मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातारा जिल्हा परिषदेच्या विषय सामित्यांच्या सभापती निवडी आज बिनविरोध पार पडल्या. यात चार पैकी भाजपचे २ सभापती झाले.  निवडीसाठी सभागृहात जाण्यापूर्वी मोबाईल बाहेर ठेवायला सांगितल्याने काळ्या फिती बांधून आलेल्या राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या सदस्यांनी पोलिसांचा निषेध करत जोरदार घोषणाबाजी करुन सभात्याग केला. सभागृहात विरोधी राष्ट्रवादी आणि सेनेचे सदस्य नसल्याने या निवडी बिनविरोध झाल्या.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी इथं कार विहिरीत कोसळल्यानं एकाच कुटुंबातल्या ९ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. एका खासगी शिकवणी वर्गाचं स्नेहसंमेलन आटोपून हे सर्वजण निघालेले असताना मंगल कार्यालयाजवळच्या शेतातल्या विहिरीत त्यांची कार कोसळली.

आपत्कालीन व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन तसंच अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी आज घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. तसंच जिल्हाप्रशासनाला दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

**होल्ड बाईट-मुख्यमंत्री**

**<><><><><>**

नांदेड इथं आज पहाटे दोन गटात झालेल्या हिंसाचारात तीन जणांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली आहे. नांदेडमधल्या दोन गुन्हेगारी टोळ्यांमधे काही कारणाने वाद झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांवर जंबिया आणि तीक्ष्ण हत्यारांनी वार केले गेले, यात दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर एकाला रुग्णालयात उपचारासाठी नेलं असता दुसऱ्या टोळीने हल्ला करून त्याची हत्या केल्याचं पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी सांगितलं. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होत आहेत. पहिला सामना साडेतीन वाजता दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडिअममध्ये दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध मुंबई इंडियन्स यांच्यात होणार आहे. दुसरा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल यांच्यात होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून अवकाळी पाऊस आणि गारपीट सुरू असून यामुळे शेतपीकांचं तसंच घरांचही मोठं नुकसान झालं आहे. बीड तालुक्यातल्या ताडसोन्ना, वलीपूर, घाटजवळा, जवळा तांडा इथं काल

संध्याकाळी सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. यात अनेक घरांच्या भिंती पडल्या तसंच घरावरची पत्रं उडून गेली. अनेठ ठिकाणी झाडं उन्मळून पडली तसंच शेतपिकांनाही मोठा फटका बसला आहे. सातत्याने दोन तीन दिवस पाऊस झाल्याने सिंदफणा नदीसह काही नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत. **जालना** जिल्ह्यातही गेल्या दोन दिवसांत वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. यामुळे काढणीला आलेल्या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. आजही जालना शहरासह जिल्ह्यात मेघगर्जनेसह पावसाला सुरुवात झाली आहे. **नंदुरबार** जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे ८३३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं आहे. कृषी विभागाने आतापर्यंत ६२ गावातील ९५४ शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे केले आहेत. ज्वारी, मका, बाजरी, कांदा, गहू, केळी, पपई आणि आंबा पिकाला अवकाळी पावसाचा फटका बसला  आहे. **अमरावती** जिल्ह्यात काल विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. याचा फटका गहू, मका, संत्रा पिकाला बसला आहे.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी आज पुण्यात राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय (नॅशनल फिल्म आर्काइव्ह ऑफ इंडिया) येथे भेट देऊन सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला आणि अधिकाऱ्यांशी संवाद साधला. यापूर्वी त्यांनी फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया येथे भेट देऊन प्राध्यापकांशी चर्चा केली तसंच शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांचा आढावा घेतला.

**//<><><><><>//**